# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि /१४६४/२०१७ दिनांक: १०/८/२०१७

प्रती,

अत्यंत तातडीचे आजच

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
संलग्नित सर्व महाविद्यालये जि.चंद्रपुर व गडचिरोली

विषय :—विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३४२८५ राज्यातील बिगर नेट सेट प्राध्यापकांना त्यांच्या सेवेचा लाभ देण्याबाबत..

संदर्भ :— १. शासन पत्र क्र. विसप्र २०१७/प्र.क्र २५३/१७ विशि १ दि. १७/७/२०१७
२. संचालनायाचे पत्र क्र युनएनआय/२०१७/तारांकित प्रश्न ३४२८५/ औ.वि/विशि/ तात्काळ/ अधिवेशन प्राध्यान/८८७८ दि. २५/७/२०१७
३. उशिनाग/वे.नि/४७६७/२०१७ दि. २७/७/२०१७

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की,संदर्भिय पत्रान्वये दि. २७ जुन २०१३ रोजीच्या शासन आदेशान्वये दि. २३/१०/१९९२ पर्यत सेवेत आलेल्या बिगर नेट सेट किती प्राध्यापकांना सेवेचा सर्व लाभ देण्यात आलेला आहे. संलग्नित संदर्भिय पत्र क्र ३ चे अवलोकन करून सदर माहिती तात्काळ मा.सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर व मा.संचालक, शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण पुणे यांना कळविण्यात यावी. व त्याची एक प्रत विद्यापीठाला सादर करावी

आपला विनित,

(डॉ.व्ही.सी.सिल्हारे)
उपकुलसचिव (प्रभारी)
महाविद्यालयीन विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलग्नित

प्रतिलिपी.

१. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण नागपुर विभाग नागपुर
२. मा.संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे

२४४६ ७।८।१७
४८२० ८।८।१७

# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.

**जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.**

**(दुरध्वनी क्र.२५६१७१३ फॅक्स क्र.०७१२-२५५४२१० )**

Website.www.dirhe.org.in/jdnagpur Email- rjdng.dhepune@gov.in

क्रमांक:उशिनाग/वे.नि./ ४६६६ /२०१७
दिनांक :- २६ /०७/२०१७

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालय
नागपूर/वर्धा/गडचिरोली/भंडारा/चंद्रपुर/गोंदीया

कुलसचिव,
सर्व विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
नागपूर/रामटेक/गडचिरोली

**विषय : विधानपरिषद तारांकीत प्रश्न ३४२८५**
**राज्यातील बिगर नेट सेट प्राध्यापकांना त्यांच्या सेवेचा लाभ देण्याबाबत**

**संदर्भ : १) शासनाचे पत्र क्रं. विसप्र २०१७/प्र.क्र. २५३/१७/विशि-१ दि. १७.०७.२०१७**
**२) संचालनालयाचे पत्र क्रं. युनएनआय/२०१७/तारांकीत प्रश्न ३४२८५/औ.वि/ विशि/तात्काळ/अधिवेशन प्राध्यान्य/८८७८/ दिनांक २५ जुलै,२०१७**

उपरोक्त संदर्भीय संचालनालयाचे पत्राची प्रत संलग्नित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने दिनांक २७ जुन, २०१३ रोजीच्या शासन आदेशाने दिनांक २३.१०.१९९२ पर्यंत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट प्राध्यापकांना त्यांच्या सेवेचा सर्व लाभ देण्याबाबत सूचना देण्यात आलेली आहे. सदर शासन आदेशान्वये संबंधित ज्या प्राध्यापकांना नेट सेट मधुन सुट मिळाल्याचे लाभ देण्यात आले व आपल्या महाविद्यालयामार्फत वेतननिश्चिती करीता सादर केलेले तसेच प्रलंबित असलेले प्रस्तावाबाबतची माहिती खालील तक्त्यात तात्काळ **आजच/ईमेलद्वारे/खास दुताकरवी हस्ते** या कार्यालयास सादर करावी. विधानपरिषद तारांकीत प्रश्न असल्याने यास प्रथम प्राध्यान्य दयावे. जेणेकरुन शासनास विहित वेळत माहिती सादर करणे सोयीचे होईल.

**शासन निर्णय दिनांक २७.०६.२०१३ नुसार नेट/सेट मधुन सुट देण्यात आलेल्या प्राध्यापकांची माहिती**

| अ.क्रं. | अधिव्याख्यात्याचे नांव | महाविद्यालय/विद्यापीठाचे नांव | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केल्याचा दिनांक | सहसंचालक यांनी प्रस्ताव मान्य केल्याचा दिनांक | विलंब झाला असल्यास त्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

सहपत्र - संचालनालयाकडील पत्र दिनांक २५ जुलै, २०१७

27.7.17

सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर,

# महाराष्ट्र शासन
# उच्च शिक्षण संचालनालय

मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१
E-Mail :vishi.dhepune@nic.in
Web : www.dhepune.gov.in
फॅक्स नं.०२०/२६१११११५३
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९

क्र. युएनआय/२०१७/ तारांकीत प्रश्न ३४२८५/औवि/वि.शि/ तात्काळ / अधिवेशन प्राधान्य / ८८७८ दि. २५.०७.२०१७ 25 JUL 2017

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय :** विधानपरिषद तारांकीत प्रश्न ३४२८५
राज्यातील बिगर नेट सेट प्राध्यापकांना त्यांच्या सेवेच्या सर्व लाभ देण्याबाबत

**संदर्भ :** शासनाचे पत्र क्र. विसप्र २०१७/प्र.क्र. २५३/१७/विशि-१ दि. १७.०७.१७

उपरोक्त संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. दि. २७ जून, २०१३ रोजीच्या शासन आदेशाने २३.१०.१९९२ पर्यंत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट प्राध्यापकांना त्यांच्या सेवेचा सर्व लाभ देण्याबाबत सूचना देण्यात आलेली आहे. सदर शासन आदेशान्वये संबंधित ज्या प्राध्यापकांना नेट सेट मधुन सुट मिळाल्याचे लाभ देण्यात आले त्यापैकी विभागीय सहसंचालक यांच्या कार्यालयाकडे वेतन निश्चितीसाठी किती प्रस्ताव प्राप्त झाले व किती प्रस्ताव प्रलंबित आहेत याबाबत माहिती सादर करणेबाबत श्री. दत्तात्रय सावंत, श्री. श्रीकांत देशपांडे वि. प. स. यांच्या विधानपरिषद तारांकीत प्रश्न ३४२८५ च्या अनुषंगाने शासनाने कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणात दि. २७ जून, २०१३ रोजीच्या शासन आदेशान्वये आपल्या विभागास प्राप्त सर्व प्रस्तावांची माहिती खालीलप्रमाणे तक्त्यात तात्काळ सादर करण्यात यावी.

**शा. नि. दि. २७.६.२०१३ नुसार नेट/सेट मधुन सुट देण्यात आलेल्या प्राध्यापकांची माहिती**

| अ.क्र. | अधिव्याख्यात्याचे नांव | महाविद्यालय / विद्यापीठाचे नांव | महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केल्याचा दिनांक | सहसंचालक यांनी प्रस्ताव मान्य केल्याचा दिनांक | विलंब झाला असल्यास त्याची कारणे . |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६. |

( सुर्यश दुसाने )
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.